# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)

## ता. आंबेगाव, जि. पुणे – ४१२४०५

# Process Control Equipments

## खरेदी करिता निविदा दस्तावेज

**२०२४-२५**

महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय , अवसरी खुर्द

तालुका–आंबेगावजिल्हापुणे ४१२४०५

दूरध्वनी क्र. : ०२१३३ २३०५८२ संकेतस्थळ: www.gcoeara.ac.in

ईमेल:office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in


जावक क्र. शाअवसंमाअ/उपकरणीकरण/ Process Control/खरेदी/२०२४/ ५५५। दिनांक:२६/१२/२०२४

## ई-निविदा सूचना

या महाविद्यालयातील येथील उपकरणीकरण व नियंत्रण अभियांत्रिकी विभागातील प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण करण्यासाठी आवश्यक असलेली Process Control Equipments यांची ई-निविदा मागवून बाह्यस्त्रोताकडून खरेदी करून घ्यावयाचे आहे. त्याकरिता नोंदणीकृत पुरवठादाराकडून दोन लिफाफे पद्धतीने ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेच्या अटी व शर्ती बाबतच्या सूचना निविदेत दिलेल्या आहेत. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक ०८-०१-२०२५ असा आहे. निविदा प्रपत्र, निविदेत जोडावयाची कागदपत्रे, निविदाकाराणे पाळावयाच्या अटी व शर्ती यांचा तपशील महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.goceara.ac.in व महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर उपलब्ध आहेत. निविदाकारांना निविदा सादर करण्यासंबंधी काही शंका असल्यास त्याचे निराकरण निविदापुर्व बैठकीत करण्यात येईल.

**ई-निविदा संबंधीची महत्वाची माहिती**

| अ. क्र. | विवरण | माहिती |
|---|---|---|
| १ | ई-निविदा नोटीस प्रसिद्धी | महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.mahatenders.gov.in यावर उपलब्ध आहे. |
| २ | कामाचे स्वरूप | शा. अ. व सं. मा. अवसरी (खुर्द) येथील उपकरणीकरण व नियंत्रण अभियांत्रिकी विभागातील प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण करण्यासाठी आवश्यक असलेली Process Control Equipments यांची ई-निविदा मागवून बाहयस्त्रोताकडून खरेदी करणे. |
| ३ | ई-निविदा शुल्क | रुपये ५,४००/- ऑनलाईन पद्धतीने संकेत स्थळावर भरण्यात यावे. |
| ४ | बयाना रक्कम | रुपये ९०,०००/- (परतावा योग्य) |
| ५ | संपर्कासाठी पत्ता | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी(खुर्द), तालुका–आंबेगाव , जिल्हा- पुणे-४१२४०५ |
| ६ | दूरध्वनी क्रमांक | ०२१३३ - २३०५८० |

| | | |
|---|---|---|
| ७ | ई-मेल आय. डी. | principal@gcoeara.ac.in |
| ८ | ई-निविदा संकेतस्थळ | https://www.mahatenders.gov.in |
| ९ | ई-निविदा वैधता | १२० दिवसांकरिता |
| १० | ई-निविदा पूर्व बैठकस्थळ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द), प्रशासकीय इमारतीतील सभागृह |

26-12-24

**डॉ. दिलीप. रा. पानगव्हाणे**

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय

अवसरी (खुर्द)

PRINCIPAL
Govt. College of Engineering
and Research. Awasari,
Tal. Ambegaon, Dist. Pune.

Govt. College of Engineering and Research ★ Avasari Khurd, Tal.Ambegaon,Dist.(Pune) ★

## महत्वाच्या तारखा

ई-निविदा भरण्यासंदर्भात महत्वाच्या तारखा खालील तक्त्यात देण्यात येत आहेत. निविदाकाराने सदर तारखांचे तंतोतंत पालन करावे.

| अ.क्र. | कार्य विवरण | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रकाशित करणे | दि. २६.१२.२०२४ (दुपारी ५.०० वाजता) |
| २ | संकेतस्थळावर ई-निविदा उपलब्ध करणे | दि. २६.१२.२०२४ (दुपारी ५.०० वाजता) |
| ३ | ई-निविदा सादर करण्याचा सुरवातीचा दिनांक | दि. २६.१२.२०२४ (दुपारी ५.०० वाजता) |
| ४ | ई-निविदा पूर्व बैठक दिनांक (इच्छुक निविदाकारांकारिता) | दि. ०२.०१.२०२५ (सकाळी ११.३० वाजता ) |
| ५ | निविदा पूर्व बैठक स्थळ | महाविद्यालयाच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृह |
| ६ | ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.०८.०१.२०२५ (दुपारी ५.०० वाजेपर्यंत ) |
| ७ | तांत्रिक निविदा छाननी दिनांक | दि.०९.०१.२०२५ (सकाळी ११.०० वाजता ) |
| ८ | वाणिज्यिक निविदा उघडणे | दि.१३.०१.२०२५ (सकाळी ११.०० वाजता) |

**सर्व पात्र निविदाकारांनी तांत्रिक व वाणिज्यिक निविदा ऑनलाईन पद्धतीने www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सादर करावी. अन्य कोणत्याही पद्धतीने या कार्यालयास सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. निविदाकाराने निविदेसोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडावी. आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नसल्यास निविदा रद्द समजण्यात येईल. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवण्यात येत आहे.**

२६-१२-२४

**डॉ. दिलीप. रा. पानगव्हाणे**

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय

अवसरी (खुर्द)

Govt. College of Engineering and Research ★ Awasari Khurd, Tal.Ambegaon, Dist.(Pune) ★

**PRINCIPAL**
Govt. College of Engineering and Research. Awasari, Tal. Ambegaon, Dist. Pune.

## निविदा पत्रक

## शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)

### Process Control Equipments खरेदी ई निविदेच्या अटी व शर्ती

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथील उपकरणीकरण व नियंत्रण अभियांत्रिकी विभागातील प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण करण्यासाठी आवश्यक असलेली Process Control Equipments यांची ई-निविदा मागवून बाह्यस्त्रोताकडून **प्रपत्र अ** मध्ये नमुद केल्याप्रमाणे खरेदी करून घ्यावयाचे आहे. त्याबाबतच्या अटी, शर्ती व प्रपत्र खालील शीर्षकानुसार आहेत.

१. निविदाकाराच्या पात्रतेचे निकष

२. निविदा सादर करावयाची पद्धती

३. निविदा उघडण्याची कार्यपद्धती

४. कार्यादेश देण्याची कार्यपद्धती

### १. निविदाकाराच्या पात्रतेचे निकष

१.१ निविदाकार GST नोंदणीकृत असावा. तसे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१.२ निविदाकाराची मागील तीन वर्षाची एकूण किमान रु. १.०० कोटी इतकी उलाढाल असावी. त्यापृष्ट्यर्थ लेखा परीक्षक (CA) यांनी प्रमाणित केलेले पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

१.३ निविदाकाराकडे मागील तीन वर्षात एकूण किमान रु. ७५.०० लक्ष इतक्या रकमेची प्रयोगशाळेतील उपकरणे याचा निविदा प्रक्रियेनुसार पुरवठा केलेला असला पाहिजे. त्यापृष्ट्यर्थ तसे समाधानकारक पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र (काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र किंवा आस्थापना प्रमाणपत्र ई.) जोडणे आवश्यक आहे.

१.४ Shop Act प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. Shop Act प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१.५ सदर उपकरणे install करणेसाठी प्रयोगशाळेतील गरजेनुसार फक्त खोली/जागा उपलब्ध करून देण्यात येईल. याखेरीज कोणतेही मनुष्यबळ, foundation work व कोणतेही इतर साहित्य पुरविले जाणार नाही.

### २. निविदा सादर करावयाची पद्धती

२.१ प्रत्येक निविदाकारास एकच निविदा भरता येईल.

२.२ निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर ई-निविदा पूर्व बैठक ( Pre Bid Meeting ) आयोजित करण्यात येईल. त्यास निविदाकाराने किवा अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहून शंका निरसन करून घ्यावे.

२.३ **तांत्रिक निविदा** - तांत्रिक निविदा ऑनलाईन पद्धतीने सादर करताना (संकेतस्थळावर अपलोड करताना) खालील कागदपत्रांचा समावेश असावा.

१) संस्थेच्या लेटरहेडवर सोबत दिलेले विवरणपत्र (**प्रपत्र - ब** )

२) वैध Shop Act नोंदणी प्रमाणपत्र

३) संस्थेच्या संचालकाचे अथवा स्वतःचे नाव, कार्यालयीन पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल यांचे विवरण

४) नोंदणीकृत आस्थापनेस अनुसरून आवश्यक वैयक्तिक मालकाचे अथवा संस्थेचे PAN कार्ड

५) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे, तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील किमान सहा महिन्याचे जीएसटी भरणा केल्याचे GSTR-1 व GSTR-3B

६) आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ चे आयकर विवरण पत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत

७) निविदाकाराची (त्याच्या आस्थापनेची) मागील तीन वर्षांची एकूण म्हणजेच आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ ची एकूण उलाढाल एकूण कमीतकमी रूपये १.०० कोटी असल्याचे संबंधीत चार्टर्ड अकाउंटंट (CA) ने उलाढाल प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र व त्या पुष्ट्यार्थ सहपत्रे आणि तसेच चार्टर्ड अकाउंटंट (CA) चे नोंदणी प्रमाणपत्राची (Registration Certificate) प्रत.

८) निविदाकाराकडे मागील तीन वर्षात किमान एकूण रु. ७५.०० लक्ष इतक्या रकमेच्या साहित्य व उपकरणे याचा निविदा प्रक्रियेनुसार पुरवठा केलेला असला पाहिचे. त्यापृष्ट्यर्थ तसे समाधानकारक पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र (काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र किंवा आस्थापना प्रमाणपत्र ई.) जोडणे आवश्यक आहे.

९) निविदा शुल्क रु. ५,४००/- ऑनलाईने पद्धतीने भरल्याच्या पावतीची पावती

१०) बयाना रक्कम रु. ९०,०००/-ऑनलाईने पद्धतीने भरल्याच्या पावतीची पावती

११) निविदाकारावर कोणत्या शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे स्वसाक्षांकित हमीपत्र

वरील सर्व कागदपत्रे स्कॅन करून त्याची एकच pdf file करून https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी.

२.४ **वाणिज्यिक निविदा**– सोबत जोडलेल्या **प्रपत्र-क** (BoQ नमुना) नुसार वाणिज्यिक निविदेत निविदाकाराचे नाव व **दर** ( **प्रत्येक उपकरणासाठी सर्व प्रकारच्या करासहित** ) सुस्पष्टपणे रुपयात नमूद करणे आवश्यक राहील.

## ३. निविदा उघडण्याची कार्यपद्धती

३.१ नमूद करण्यात आलेल्या तारखेस सदर संकेतस्थळावर सादर झालेल्या निविदा उघडण्यात येतील व समितीद्वारे त्यांची तांत्रिक छाननी करण्यात येईल.

३.२ तांत्रिक छाननी दरम्यान निविदाकाराने स्कॅन करून अपलोड केलेली सर्व प्रमाणपत्रे व वैधता तपासण्यात येईल.

३.३ पात्र निविदाकारांची यादी संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल .

३.४ तांत्रिक छाननीअंती पात्र असलेल्या निविदाकारांच्या वाणिज्यिक निविदा उघडण्यात येतील.

## ४. कार्यादेश देण्याची कार्यपद्धती

४.१ वाणिज्यिक निविदेत सोबत जोडलेल्या **प्रपत्र-क** (BoQ नमुना) नुसार वाणिज्यिक निविदेत निविदाकाराने नमुद केलेले दरांप्रमाणे सर्व साहित्यांच्या दरांची **एकूण बेरीज (सर्व प्रकारच्या करासहित)** जो निविदाकार सर्वात न्यूनतम L1 घोषित होईल त्याच पात्र निविदाकारास कार्यादेश देण्यात येईल.

४.२ त्यानंतर ७ दिवसाच्या आत Work Order च्या एकूण रकमेच्या (सर्व करांसहित) ३% इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून बँक ग्यारंटी रुपात जमा करावी लागेल.

४.३ सदर निविदेतील Process Control Equipments (यादीतील सर्व उपकरणे) चा पुरवठा ४५ दिवसांच्या आत करून त्या बाबतचा खरेदी समितीने काम समाधानकारक पुर्ण झाल्याचे प्रमाणित केले असेल तरच संपुर्ण पुरवठा झाला असे समजण्यात येईल व संपुर्ण देयक एकदाच एक रकमी अदा करण्यात येईल. पुरवठा ४५ दिवसांच्या आत पुर्ण न झाल्यास प्रचलित शासकीय नियमांनुसार दंड आकारण्यात येईल व सदर दंड देयकातील रकमेतून वजा करून उर्वरित रक्कम पुरवठादारास अदा करण्यात येईल. तसेच

**पुरवठादाराने यापूर्वी संस्थेमध्ये दिलेली सेवा असमाधानकारक असल्यास किवा करारानुसार सेवाकाळ पूर्ण न करता सेवा मधेच खंडित केलेली असल्यास त्यांनी निविदा सादर करू नये. अशा पुरवठादरानी निविदा सादर केल्यास ती बाद ठरविण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

Govt. College of Engineering and Research ★ Awasari Khurd, Tal. Ambegaon, Dist.(Pune) ★

26-12-24

डॉ .दिलीप .रा .पानगव्हाणे

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी )खुर्द(

PRINCIPAL
Govt. College of Engineering
and Research. Awasari,
Tal. Ambegaon, Dist. Pune.

## प्रपत्र- अ (Process Control Equipments यांचा तांत्रिक विनिनिर्देश तपशील)

## (Proforma for the Technical Specifications)

## Process Control Equipments List with specifications

| Sr. No. | Name of Equipment | Specifications | Quantity |
|---|---|---|---|
| 1 | Cascade Control trainer | • DP transmitter: Type Capacitance, Two wire, Range 0–200 mm, Output 4–20mA sq. root;<br>• Level transmitter: Type Electronic, Two wire, Range 0–250 mm, Output 4–20mA;<br>• I/P converter: Input 4-20mA, Output 3-15 psig; Power supply: Model S-15-24, Output 24 VDC, 0.7 A;<br>• Control valve: Type Pneumatic, Size 1/4"", Input 3–15 psig, Air to close, Char. Linear;<br>• Rotameter: 10-100 LPH;<br>• Pump: Fractional horse power, type submersible;<br>• Process tank: Transparent, Acrylic, with 0-100% graduated scale;<br>• Flow measurement: Orifice meter; Air filter regulator: Range 0-2.5 kg/cm2;<br>• Pressure gauge: Range 0-2.5 kg/cm2(1No), Range 0-7 kg/cm2(1No)",<br>• Interface with LabVIEW / MATLAB | 01 |
| 2 | IoT interface system | • Interface unit VBox (Wi-Fi based);<br>• Power supply 24 VDC (12-18 VDC), Meanwell;<br>• Obtain data through Serial communication (RS232/RS485/Ethernet);<br>• Connect to cloud platforms through 3G/4G/Ethernet or Wi-Fi, IoT Trainer Kit with Raspberry Pi & Arduino | 01 |
| 3 | Multi function calibrator for pressure and temperature | • Multi function calibrator for pressure and temperature<br>• calibration measures dc voltage, current, resistance, RTDs and thermocouples<br>• Pressure Modules Includes 24 V dc transmitter loop power supply Measures 4-20 mA loop current Includes automated switch-test function | 01 |
| 4 | Interacting and Noninteracting system | • Rotameter: 10-100 LPH;<br>• Process tank Acrylic, Cylindrical, Inside Dia. 92mm with graduated scale in mm. (3 Nos);<br>• Supply tank SS304;<br>• Pump Fractional horse power, type submersible | 01 |
| 5 | Digital Turbidity meter | • Microprocessor based turbidity meter with 16x2 LCD display having 2 ranges upto 1000 JTU with memory storage of 2 standards. | 01 |
| 6 | Air Quality monitoring system | • IAQ PM 2.5-340H, Operating Temp. 50 deg Celsius,<br>• 24 VAC, Dimension 85x130x36.5 mm, body plastic, with Display. | 01 |
| 7 | Hand held RTD Calibrator | • Response Time Input/output < 100ms,<br>• Source Resolution 0.001 mA,<br>• Meter/Measurement Accuracy: +-0.02% of reading<br>• Meter/Measurement Range: 0-24 mA ,0-30 V<br>• Meter/Measurement Resolution: 0.001 mA,<br>• Source Accuracy+-0.02% of reading | 01 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • Source Range 0-24 mA | |
| 8 | Digital Clamp Meter | • Digital Clamp Meter, 1200A AC/DC True RMS<br>• AC Current: 1000A, DC Current: 1200A,<br>• AC Voltage: 750V, DC Voltage: 1000V,<br>• True RMS Reading: AC<br>• Current Data Hold APO, Duty Cycle, Frequency 4200 Counts and Jaw Size: 55mm. | 08 |
| 9 | PLC Trainer Kit | • PLC Trainer Kit (Allen Bradley Micrologics 1400, Schneider-Modicon TM171, Siemens S7-200 / Delta DVP16ES2) Above THREE brands, one model of each type<br>• I/Os :Digital Input: 12, Digital Output: 8, Analog Input: 2, Analog Output: 2<br>• Analog Input Type: Voltage or current (differential), Range: ±10 V, or 0 ~ 20 mA<br>• Analog Output Type: Voltage or current, Range: 0-10 V or 0 ~ 20 mA<br>• Communications : Ethernet / RS485<br>• Power source : 230 V AC | 01 |
| 10 | PLC Software | RS LOGIX 500 Standard edition | 01 |
| 11 | Flow measurement trainer | • Flow Measurement using Venturimeter, Orifice meter, Pitot tube, Rotameter, and Water meter<br>• Venturimeter Size 18.5 mm, Bore 10 mm, Acrylic;<br>• Orifice meter Size 18.5 mm, Bore 12 mm, Acrylic;<br>• Pitot tube Size 18.5 mm, Acrylic;<br>• Rotameter 60-600 LPH;<br>• Water meter Size 1/2"BSP, brass, Least count 1 lit;<br>• Supply tank SS304, Measuring Tank Capacity 3 lit, Acrylic;<br>• Pressure difference Tube with graduated scale;<br>• Pump Fractional horse power, type submersible;<br>• Piping 3/4" BSP, CPVC | 01 |
| 12 | Temperature measurement trainer | • Type of control SCADA; Control unit Digital indicating controller with Ethernet communication;<br>• Temperature Transmitter, Type : Fixed, Make: ABUSTEK, Model: Fr Block,<br>• Input: PT-100, Range: 0 To 100°C, Output: 4-20 mA,<br>• Power Supply: 24 V DC,<br>• Dimension: 44 X 25 MM, Precalibrated to 100 Deg C ;<br>• Heating control : Solid State Relay (SSR), Input 4-20 mA, Output 0-230 AC, Capacity 50 A.;<br>• Heater Type Electrical 2 coil, Capacity 3 KW;<br>• Rotameter 6-60 LPH, Make Eureka;<br>• Process tank SS304, Capacity 0.5 lit, insulated,<br>• Interface with LabVIEW / Matlab / Simulink | 01 |
| 13 | Air compressor | Reciprocating air compressor, 2000w, Tank Capacity-50Lit, Working Pressure- 8 bar, Volt-230V, 50Hz, Silent Compressor | 02 |
| 14 | NI DAQ card | Multifunction I/O,Number of Inputs: 8 - Analog 13 - Digital,Input Range: ±10V, Input Resolution : 16 Bits, Number of Outputs : 2 - Analog, 13 - Digital,Output Range: ±10V, Output Resolution: 16 Bits | 01 |

## प्रपत्र- ब (तांत्रिक निविदा) (Proforma for the Technical Bid)

## (संस्थेच्या लेटरहेडवर)

निविदाकाराने स्वतःच्या लेटरहेडवर खालील नमुन्यात सर्व आवश्यक माहिती भरून सही/शिक्का करून pdf format मध्ये www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करावा. त्यासोबत या निविदा सूचनेमध्ये मागणी केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांच्या / प्रमाणपत्रांच्या प्रति स्कॅन करून त्या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक आहे. अपूर्ण निविदा किवा कंत्राटदाराची स्वाक्षरी नसलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाही. तांत्रिक निविदांमध्ये पात्र ठरणाऱ्या निविदाकारांची यादी या महाविद्यालयाच्या संकेत स्थळ www.gcoeara.ac.in येथे देखील दिनांक ०९-०१-२०२५ रोजी दुपारी ०४.३० वाजता प्रसिद्ध करण्यात येईल. तांत्रिक निविदामधून पात्र ठरलेल्या निविदाकारांच्या वाणिज्यिक निविदा दिनांक १३-०१-२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदाकारांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील.

**तांत्रिक निविदेसाठी आवश्यक कागदपत्रे**

| अनु. क्र. | तपशील | शेरा |
|---|---|---|
| १ | निविदाकाराच्या लेटरहेडवर निविदाकाराचा ई-मेल, दूरध्वनी क्रमांक, सही व शिक्का असलेले स्वतःचे किवा संस्थेची माहिती असलेले विवरणपत्र | होय / नाही |
| २ | PAN कार्डची प्रत | होय / नाही |
| ३ | जी.एस.टी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत व आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील किमान सहा महिन्याचे जीएसटी रिटर्न्स सादर केल्याच्या पुराव्याची प्रत (Form GSTR-1 व GSTR-3B) | होय / नाही |
| ४ | आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ चे आयकर विवरणपत्र (रिटर्न्स) सादर केल्याच्या ACKNOWLEDGEMENT ची प्रत | होय / नाही |
| ५ | वैध Shop Act नोंदणी प्रमाणपत्र | होय / नाही |
| ६ | निविदाकाराची (त्याच्या आस्थापनेची) मागील तीन वर्षाची एकूण म्हणजेच आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ ची एकूण उलाढाल कमीतकमी **रूपये १.०० कोटी** असल्याचे संबंधीत चार्टर्ड अकाउंटंट (CA) ने उलाढाल प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र व त्या पुष्ट्यार्थ सहपत्रे आणि तसेच चार्टर्ड अकाउंटंट (CA) चे नोंदणी प्रमाणपत्राची (Registration Certificate) प्रत. | होय / नाही |
| ७ | निविदाकाराकडे मागील तीन वर्षात कोणत्याही आस्थापनेस किमान एकूण रु. ७५.०० लक्ष इतक्या रकमेच्या फर्निचर किंवा इतर साहित्य व उपकरणे याचा निविदा प्रक्रियेनुसार पुरवठा केलेला असला पाहिचे. त्यापृष्ट्यर्थ तसे | होय / नाही |

| | | |
|---|---|---|
| | समाधानकारक पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र (काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र किंवा आस्थापना प्रमाणपत्र ई.) | |
| ८ | निविदा शुल्क रु. ५,४००/- ऑनलाईने पद्धतीने भरल्याच्या पावतीची प्रत | होय / नाही |
| ९ | बयाना रक्कम रु. ९०,०००/-ऑनलाईने पद्धतीने भरल्याच्या पावतीची प्रत | होय / नाही |
| १० | निविदाकारावर कोणत्या शासकीय/निमशासकीय आस्थापनेने दंडात्मक कार्यवाही (काळ्या यादीत नाव टाकणे, निष्कासन इत्यादी) केली नसल्याबद्दलचे स्वसाक्षांकित हमीपत्र | होय / नाही |

मी खालील सही करणारा शपथपूर्वक असे प्रमाणित करतो/ करते की वर नमूद करण्यात आलेली माहिती खरी असून त्यात कोणतीही माहिती खोटी आढळ्यास होणाऱ्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी हि माझी राहील. तसेच सदर कंत्राटासाठी नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

स्थळ :　　　　　　　　सही :

दिनांक :　　　　　　　　नाव :

प्रपत्र- क (वाणिज्यिक निविदा) (Proforma for the Commercial Technical Bid)(BoQ)

निविदाकाराने https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरिल सदर निविदेतील वाणिज्यिक निविदे मधील (Financial Bid ) BoQ file मध्ये Name of the Bidder/Bidding Firm/Company अचूक नमूद करावी व त्याच BoQ file मध्ये मुद्दा क्र. २.४ नुसार दर (प्रत्येक उपकरणासाठी सर्व करांसहित ) अचूक भरावेत.